क्रमांक : १६७२ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : १ फेब्रुवारी, २०२२.

:: कार्यालयीन आदेश ::

मा.मंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने "या सचिवालयातील आस्थापना विषयक बाबी/सेवाप्रवेश नियम" या विवक्षित कामासाठी एमपॅनलमेंटद्वारे (Empanelment) **श्री.जयंवत बाळकृष्ण राणे यांची करार पध्दतीने या आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आली आहे. उक्त नियुक्ती ही** शासकीय / निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे या संदर्भातील सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक :- संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांकित १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार करण्यात आली आहे. **श्री.राणे यांच्या पदाचे नामाभिधान "सेवानिवृत्त अवर सचिव (समिती)" असे राहिल.**

**श्री.जयंवत बाळकृष्ण राणे, सेवानिवृत्त अवर सचिव (समिती) यांना सदरहू नियुक्तीच्या कालावधीत खालील नमूद अटी व शर्ती लागू असतील :-**

**१) पारिश्रमिक :-**

श्री.जयंवत राणे यांना नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात आले आहे (श्री.राणे यांचे मासिक पारिश्रमिक निश्चितीचे आदेश स्वतंत्र निर्गमित करण्यात येतील.) या प्रमाणे निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक श्री.राणे यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे) कायम राहिल.

**२) भत्ते :-**

श्री.राणे यांना शासन निर्णयातील तरतुदीनुसार निश्चित होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाच्या "जास्तीत जास्त २५%" इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम "निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता" या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह अनुज्ञेय राहिल.

३) **प्रवास व दैनिक भत्ता :-**

श्री.राणे यांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या कामकाजाच्या अनुषंगाने आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहिल.

४) **शासकीय निवासस्थान :-**

श्री.राणे हे नियुक्तीच्या वेळेस शासकीय निवासस्थानात राहत असतील तर ते शासकीय निवासस्थान शासन नियमातील अटी व शर्तीच्या अधीन राहून कायम ठेवण्यास त्यांना अनुमती देण्यात येत आहे.

५) **इतर अटी व शर्ती :-**

**(एक)** करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे श्री.राणे यांना शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

**(दोन)** नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी श्री.राणे यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

**(तीन)** श्री.राणे त्यांच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतलेले नसावे.

**(चार)** श्री.राणे यांनी गुंतलेले हितसंबंध (Conflict of Interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

**(पाच)** श्री.राणे यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्र / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहिल.

**(सहा)** श्री.राणे यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. श्री.राणे यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन त्यांच्या कामाचे मूल्यमापन करतील.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या श्री.राणे यांच्या पारिश्रमीका व भत्यापोटी येणारा खर्च **"मागणी क्रमांक झेडसी-१, "२०११, संसद/राज्य/संघराज्य क्षेत्र विधानमंडळे, ०२ राज्य/संघराज्य क्षेत्र विधानमंडळे, १०-कंत्राटी सेवा (दत्तमत), "** या लेखाशिर्षाखालील मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

..३/-

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्तीच्या कालावधीतील करार पद्धतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी श्री.राणे यांची राहिल व तशा आशयाचे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात यावे. तसेच, करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबत आणि नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही याचा देखील उल्लेख सदरहू बंधपत्र/हमीपत्रात श्री.राणे यांनी करावा.

आदेशानुसार,

(स्वाक्षरी)

**( मोहन काकड )**

अवर सचिव,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

**श्री.जयवंत बाळकृष्ण राणे,**

३/११ आशिक अली चाळ, न्यू श्याम नगर,

जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०० ०६०.

**प्रतिलिपी :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्षनेते यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

५) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

६) या सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.

७) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

८) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

९) उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१०) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

११) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१२) "क-२" (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय. (सदहू आदेश संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी)

१३) निवडनस्ती.